**ठळक बातम्या**

- गुढीपाडव्याचा राज्यभरात उत्साह, अनेक ठिकाणी नववर्ष स्वागत यात्रांचं आयोजन
- नाशिकमधला भोंदू अशोक खरातच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्यसरकारकडून एसआयटीची स्थापना
- गडचिरोलीत ११ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण
- शेअर बाजारात पावणे २ वर्षातली सर्वात मोठी घसरण, गेल्या ३ दिवसात झालेल्या तेजीपेक्षाही गुंतवणूकदारांचे अधिक नुकसान

**आणि**

- राज्याच्या अनेक भागात आजही पावसाची हजेरी, काही ठिकाणी गारपीट, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या काही भागात ऑरेंज अलर्ट

**<><><><><><>**

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा हा वर्षारंभाचा सण आज राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा झाला. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून आता ऐकुया…

**होल्ड.. व्हीसी**

*(घरोघरी रेशमी वस्त्र आणि कलश धारण केलेल्या गुढ्या उभारून त्यांची पूजा करण्यात आली. नववर्षाचा प्रारंभ देवदर्शनाने करण्यासाठी विविध मंदिरांमधे पहाटेपासून रांगा लागल्या होत्या. मिष्टान्नाचं भोजन करण्याची प्रथा असल्यानं मिठाईच्या दुकानांमधे गर्दी झाली होती. साडेतीन मुहूर्तातला वर्षातला हा पहिलाच मुहूर्त साधून सोनं चांदी, आणि मौल्यवान वस्तूंची खरेदी करण्यात आली.*

*रस्त्यांवरच्या शोभिवंत रांगोळ्या, झेंडूच्या फुलांची सजावट, रंगीबेरंगी पारंपरिक पोषाख, सामाजिक संदेश देणारे फलक आणि चित्ररथ तसंच वाजत गाजत केलेल्या*

*करतब कसरती हे गुढीपाडव्याच्या शोभायात्रांचं वैशिष्ट्य. ढोल, लेझीम लाठीकाठी, मल्लखांब अशा खास मराठी खेळांचं दर्शन या शोभायात्रांमधून घडलं.*

*मुंबईत गिरगाव इथं पारंपरिक वेशभूषेत तरुणांनी दुचाकी रॅली काढली. ढोल आणि लेझीम पथकांच्या कवायती, मर्दानी खेळांची प्रात्यक्षिकं आणि मनोरंजन जगतातल्या अनेक मान्यवरांचा सहभाग हे स्वागतयात्रेचं वैशिष्ट्य होतं. भरजरी पोषाख, दिमाखदार फेटे आणि वाद्यमेळाने गिरगावातले प्रमुख रस्ते फुलून गेले होते. ठाणे शहरात कौपिनेश्वर मंदिर समितीच्या वतीनं आयोजित स्वागत यात्रेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले होते. विविध समुदायांच्या लोककलांचं सादरीकरण या यात्रेत करण्यात आलं. डोंबिवलीमधे ऐतिहासिक इमारतींच्या आणि विकासप्रकल्पांच्या प्रतिकृती साकारणारे चित्ररथ स्वागतयात्रेचं आकर्षण ठरलं. गुढीपाडव्यानिमित्त हंगामातल्या हापूस आंब्याचं स्वागत आज नवी मुंबईच्या मार्केट यार्डमधे झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नागपूरमधे नववर्ष स्वागत यात्रेत सहभागी झाले. देश आधुनिकतेकडे वाटचाल करत असताना तरुणाई परंपरा जपत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. रत्नागिरीमधे शोभायात्रेचं हे २२वं वर्ष होतं. ग्राममंदिर ते समाजमंदिर अशी यंदाची संकल्पना होती. सांगलीत विविध कार्यक्रमांसह हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. नाशिक शहरासह जिल्ह्यात आज ठिकठिकाणी शोभायात्रा काढण्यात आल्या. ढोल ताशांच्या गजरात साहसी खेळांची प्रात्यक्षिकं दाखवण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यात होळीपासून सुरू झालेल्या मढी इथल्या कानिफनाथांच्या यात्रेची आज गुढीपाडव्याला सांगता झाली. )*

**<><><><><><>**

अवघ्या २ आठवड्यात सुमारे सव्वा लाख घरगुती आणि व्यावसायिक पीएनजी जोडण्या वितरित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी दिली. नवी दिल्ली इथे आयोजित

पश्चिम आशियातल्या सध्याच्या घडामोडींविषयीच्या पत्रकार परिषदेला त्या संबोधित करत होत्या. गेल्या तीन दिवसात साडेपाच हजारांपेक्षा जास्त ग्राहकांनी पीएनजीचा पर्याय निवडल्याचंही शर्मा यावेळी म्हणाल्या.

**होल्ड.. बाईट- सुजाता शर्मा**

**<><><><><>**

केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे अशी ग्वाही केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज दिली. बहिणाबाई चौधरी विद्यापीठात आयोजित, केळी उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. केळी निर्यातीतल्या अडचणी आणि योग्य दर यासाठी उपाययोजना करण्याची खात्रीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

भोंदूगिरी करणारा स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणाचा तपास महिला पोलीस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्याकडे देण्यात आला आहे. खरात याने एका महिलेवर अत्याचार केल्या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खरात याचं कार्यालय आणि घराच्या झडतीत पेन ड्राइव्ह मध्ये ५८ व्हिडीओ सापडले आहेत. सातपुते यांनी आज नाशिकमध्ये या प्रकरणाचा आढावा घेतला.

**<><><><><>**

विविध दलममधल्या ११ जहाल नक्षलवाद्यांनी आज गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. त्यात १ विभागीय समिती सदस्य, एक क्षेत्र समिती सचिव, एक प्लाटून पार्टी सदस्य, १ कमांडर, १ क्षेत्र समिती सदस्य आणि अन्य ६ दलम सदस्यांचा समावेश आहे. त्यांच्यावर एकूण ६८ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज झालेल्या जोरदार घसरणीमुळं गेल्या ३ दिवसात झालेल्या तेजीपेक्षाही गुंतवणूकदारांचे जास्त नुकसान झाले. सेन्सेक्स आज तब्बल २ हजार ४९७ अंकांनी कोसळून ७४ हजार २०७ अंकांवर बंद झाला. निफ्टी तब्बल ७७६ अंकांची घट नोंदवून २३ हजार २ अंकांवर बंद झाला. गेल्या पावणे २ वर्षातली शेअर बाजारातली ही सर्वात मोठी घसरण आहे. तेलाच्या वाढत्या किंमती, जागतिक पातळीवर कमजोर वातावरण, एचडीएफसीच्या अध्यक्षांनी दिलेला राजीनामा यामुळं या घसरणीत वाढ झाली.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं निर्यातदारांसाठी सुमारे ५०० कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली आहे. १४ फेब्रुवारी ते १५ मार्च दरम्यान मध्यपूर्वेच्या मार्गाने निर्यात केलेल्या वस्तूंना सरकार कुठल्याही अतिरीक्त प्रीमियम शिवाय वीमा संरक्षण देणार आहे. वीमा संरक्षणासाठीचा अतिरीक्त प्रीमियम सरकार भरणार आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालक लव अग्रवाल यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

निर्यातकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी विविध मंत्रालयांशी समन्वय साधण्याचे काम सुरू असल्याची माहिती वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिली.

**<><><><><>**

केंद्रीय बंदरं, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी आज मुंबईत बंदर आणि सागरी क्षेत्राच्या प्रतिनिधींबरोबर आढावा बैठक घेतली. पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या अडचणी, जहाज वाहतूक क्षेत्रावर याचा झालेला परिणाम यांसह इतर विषयांवर या बैठकीत चर्चा झाली. या संघर्षाच्या काळात भारताचा सागरी व्यापार सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं जलद पावलं उचलल्याचं प्रतिपादन सोनोवाल यांनी या बैठकीत केलं.

**<><><><><>**

हवामान विभागाने जवळपास संपूर्ण राज्यात उद्या सकाळपर्यंत पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः अहिल्यानगर, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला  आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात  तुरळक ठिकाणी वादळी पावसाबरोबर प्रतितास ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहतील असं हवामान विभागानं म्हटलं आहे. राज्यात अनेक ठिकाणी आज अवकाळी पावसाने हजेरी लावली. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

## होल्ड व्हाइस कास्ट

***(पुणे*** *जिल्ह्यात आज अनेक ठिकाणी पाऊस झाला. पुणे शहरात दुपारी सिंहगड रस्ता, वडगाव खुर्द परिसरात मेघगर्जनेसह हलक्या पावसानं हजेरी लावली.*

***सोलापूर*** *जिल्ह्यात दोन दिवसांपासून अनेक भागात पाऊस पडत आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातल्या नान्नज, मार्डी, नरोटेवाडी, गुळवंची या भागात आज  पाऊस पडला.*

***सातारा*** *जिल्ह्यात काही भागात आज मेघगर्जनेसह जोरदार पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी गारपीट झाली.*

***अहिल्यानगर*** *जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पावसाने हजेरी लावली. पारनेर,अकोले,पाथर्डी या तालुक्यातल्या गावांमधे गारांसह पाऊस झाला.*

***भंडारा*** *जिल्ह्यातही आज पाऊस झाला. काही ठिकाणी वादळी पावसाने मक्याचं पीक जमीनदोस्त झालं.*

***जालना*** *शहरासह जिल्ह्यातल्या काही भागात मध्यम स्वरुपाचा पाऊस तर काही भागात गारपीट झाल्याचं वृत्त आहे.*

***धुळे*** *शहर तसंच जिल्ह्यातल्या विविध भागात आज संध्याकाळी मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली. )*

**<><><><><>**

एचडीएफसी बँकेचे अध्यक्ष अतनु चक्रवर्ती यांनी कार्यकाळ संपण्यापूर्वीच पदाचा राजीनामा दिला आहे. बँकेत गेल्या २ वर्षात झालेल्या घडामोडी आणि

कार्यपद्धती आपल्या व्यक्तिगत नीतीमूल्यांच्या विरोधात होत्या, असं कारण चक्रवर्ती यांनी दिलं आहे. त्यांचा कार्यकाळ मे २०२७मधे संपणार होता. चक्रवर्ती यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदावर माजी मुख्य कार्यकारी अधिकारी केकी मेस्त्री यांची तात्पुरती नेमणूक करायला रिझर्व बँकेनं मंजुरी दिली आहे.

एचडीएफसी बँक ही अतिशय महत्त्वाची बँक असून तीची वित्तीय परिस्थिती चांगली आहे, व्यावसायिक पद्धतीनं तिचं कामकाज सुरू आहे. नियमित तपासणीमध्ये बँकेच्या व्यवहारात काहीही चिंताजनक आढळून आलं नसल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

<><><><><><>

भंडारा जिल्ह्यात साकोली तालुक्यात शेतात मोहाची फुलं वेचण्यासाठी गेलेला शेतकरी वाघाच्या हल्ल्यात ठार झाला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला असून वनविभागाने मृताच्या कुटुंबाला २५ लाखांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

//<><><><><><>//